**महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार विहित कालमर्यादेत कार्यवाही करण्याबाबत....**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२६/प्र.क्र. ४९/रवका-१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक: ०५ ऑक्टोबर, २०२६

**संदर्भ:** या विभागाचे समक्रमांकाचे दिनांक ११ सप्टेंबर, २०२६ रोजीचे शासन परिपत्रक.

**परिपत्रकः-**

उपरोक्त संदर्भाधीन शासन परिपत्रकान्वये मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. तथापि, मा. उच्च न्यायालयाने याअनुषंगाने सुस्पष्ट व परिणामकारक सूचना देण्याबाबत आदेश दिले आहेत. त्यानुसार महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार विहित कालमर्यादेत कार्यवाही करण्याबाबत या शासन परिपत्रकान्वये पुनःश्च पुढीलप्रमाणे स्वयंस्पष्ट सूचना देण्यात येत आहेत:-

१. महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम १० (१) अनुसार प्रत्येक शासकीय कर्मचारी, त्यास नेमून दिलेले किंवा त्याच्याशी संबंधित असलेले शासकीय कर्तव्य व शासकीय काम अत्यंत दक्षतेने व शक्य तितक्या शीघ्रतेने पार पाडण्यास बांधील असून विहित कालमर्यादेत कार्यवाही न केल्यास सदर अधिनियमाच्या कलम १० (२) अनुसार म.ना.से. (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील तरतुदीप्रमाणे त्याच्याविरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची तरतूद आहे.

२. विविध प्रशासनिक विभागांमध्ये अनेक प्रकरणी विविध अधिकाऱ्यांच्या स्तरांवर प्रलंबित असलेल्या प्रकरणांवर/निवेदनांवर तात्काळ निर्णय घेण्याबाबत मा. उच्च न्यायालयास आदेश पारित करावे लागतात तसेच कोणत्याही सबळ कारणांशिवाय सदर प्रस्ताव/निवेदने जाणीवपूर्वक दीर्घकाळ प्रलंबित ठेवली जात असल्याची बाब मा. उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आली आहे व याबाबत मा. उच्च न्यायालयाने वेळोवेळी नाराजी व्यक्त केली आहे. मा. उच्च न्यायालयाने शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम १० मधील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत आवश्यक त्या अतिरिक्त सूचना सर्व शासकीय कार्यालयांना देण्याचे निर्देश सामान्य प्रशासन विभागास दिले आहेत.

३. महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम १० (१) मधील तरतुदीनुसार प्रत्येक शासकीय कर्मचारी, त्यास नेमून दिलेले किंवा त्याच्याशी संबंधित असलेले शासकीय कर्तव्य व शासकीय काम अत्यंत दक्षतेने आणि शक्य तितक्या शीर्घतेने पार पाडण्यास बांधील असेल अधिनियमातील या तरतुदीचे पालन सर्व प्रशासकीय विभागांकडून काटेकोरपणे होत नसल्याने अनेक न्यायालयीन प्रकरणे उद्धभवत आहेत. सदर बाब विचारात घेऊन पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत:-

(अ) महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम १० (१) मधील तरतुदीचे काटेकोरपण पालन करावे. सदरहू तरतुदीचे पालन न करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुद्ध अधिनियमाच्या कलम १० (२) व १० (३) अनुसार महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ अन्वये शिस्तभंगाची कारवाई तातडीने करण्यात यावी.

(ब) सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुखांनी त्यांच्या नियंत्रणाखालील विभाग त्याचप्रमाणे कार्यालयांतील/विभागांतील प्रलंबित अर्ज/निवेदने/प्रकरणे (नस्त्या) यांचा मासिक आढावा घ्यावा व त्यांचा जलदगतीने निपटारा होण्याच्या दृष्टीने संबंधितांना निर्देश द्यावेत, मासिक आढाव्याचे विवरणपत्र पुढीलप्रमाणे राहील:-

| अ.क्र. | प्राप्त संदर्भ/ नस्त्या | निकाली काढण्यात आलेले संदर्भ/ नस्त्या | प्रलंबित संदर्भ/ नस्त्या | प्रलंबित असलेले संदर्भ/ नस्त्यांबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती. |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |

(क) सर्व विभागप्रमुखांनी/कार्यालय प्रमुखांनी त्यांच्या अधीनस्थ कार्यालयात प्रत्यक्ष भेट देऊन कार्यालयात प्राप्त होणारे संदर्भ/आवेदनपत्र/नस्त्यांवर केलेल्या कार्यवाहीबाबत उक्त विवरणपत्रानुसार मासिक आढावा घ्यावा.

(ड) या कार्यालयीन भेटीच्या वेळी कार्यालयामध्ये विनाकार्यवाही प्रलंबित असलेल्या संदर्भांवर/ निवेदनांवर विहित वेळेत कार्यवाही न करणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुद्ध संबंधित अधिनियमातील तरतुदीनुसार कारवाई करावी. यानुसार केलेल्या कारवाईचा पुढील विवरणपत्रानुसार अहवाल संबंधित वरिष्ठ कार्यालयास सादर करावा.

| अ.क्र. | विलंबास जबाबदार अधिकारी/कर्मचारी (संख्या) | जबाबदार अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुद्ध केलेल्या कारवाईचा अहवाल (संख्या) |
|---|---|---|
| १. | २. | ३. |

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत असून त्याचा संगणक संकेतांक २०२६१००५१५३९०७२१०७ असा आहे. तसेच सदर परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by RAJESH AGGARWAL
Date: 2026.10.05 16:12:36 +05'30'

**(राजेश अग्रवाल)**
**मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, लोकभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधानभवन, मुंबई.
४) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधानभवन, मुंबई.
५) मा. उपमुख्यमंत्री, नगरविकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम (सा.उ.) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा. उपमुख्यमंत्री, राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) सर्व मा. मंत्री/मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
९) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, विधानभवन, मुंबई.
१०) सर्व मा. संसद सदस्य/विधानपरिषद सदस्य/विधानसभा सदस्य.
११) मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
१२) सर्व प्रशासनिक विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,मंत्रालय, मुंबई (त्यांच्या आधिपत्याखालील सर्व शासकीय कार्यालयांच्या निदर्शनास आणण्याच्या विनंतीसह).
१३) पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१४) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
१५) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.
१६) महासंचालक, माहिती व जनसंपर्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१७) सर्व विभागीय आयुक्त.
१८) सर्व पोलीस आयुक्त (पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई वगळून).
१९) सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक.
२०) सर्व जिल्हाधिकारी.
२१) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळून).
२२) सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक.
२३) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.

**प्रत-**

१) आयुक्त, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालय, मंत्रालय, मुंबई (ई-ऑफिस सूचना फलक व सर्व शासकीय संकेतस्थळे येथे परिपत्रक प्रकाशित करण्याच्या विनंतीसह).

२) सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/ कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.

३) यशदा, पुणे.

४) महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.

५) निवडनस्ती (रवका-१).